# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक.

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

१.०१ संशोधनाची पार्श्वभूमी.

१.०२ संशोधनाचा विषय.

१.०३ संशोधनाची उद्दिष्टे.

१.०४ संशोधनाची गरज व महत्व.

१.०५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१.०६ प्रकरणांचे नियोजन.

# प्रकरण पहिले.

## प्रास्ताविक.

### १.०१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी :-

शिक्षक प्रशिक्षणाचे स्वरूप आज जे दिसत आहे त्याच्या पाठीमागे अनेक वर्षांच्या मतमतांतराचा झगडा व शास्त्रज्ञांच्या परिश्रमांचे पर्वत उभे आहेत. शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला व शिक्षक प्रशिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण हे राष्ट्राच्या जडणघडणासाठी, देशाच्या उन्नतीसाठी, राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी, सुजाण व जागरूक नागरिक निर्माण करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षणासाठी प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थींना जर उच्च शिक्षण दिले तर त्यातून राष्ट्रीय एकात्मता व सुजाण नागरिक निर्माण होतील. असे शिक्षण प्रशिक्षणार्थींना दिले गेले तर निश्चितपणे त्यांच्याकडून शिक्षण घेणारे विद्यार्थी शिक्षक हे ध्येयवादी, सुजाण नागरिक निर्माण होतील कारण एका शिक्षकाला चांगले दर्जेदार प्रशिक्षण मिळाले तर तो आपल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देईल.

आज आपल्या भारत सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. त्यामध्ये सरकारने वयोमर्यादा चौदा वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण केले आहे. प्राथमिक शिक्षण हे देशातील प्रत्येक नागरिकाला घेता यावे हा हेतू त्यामागे आहे. भारतीय राज्यघटनेने इ.स.१९५० साली मानवी मूलभूत हक्कांपैकी "शिक्षण घेणे" हा एक हक्क मान्य केला आहे. भारत देश हा विकसनशील देश आहे. जर आपल्या देशाची, राष्ट्राची औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर शिक्षकांचे प्रशिक्षण हे चांगल्या दर्जाचे शिक्षक कसे निर्माण होतील याकडे लक्ष दिले पाहिजे. एकूण प्रत्येक शिक्षक प्रशिक्षणार्थींना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे ज्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षक निर्माण होतील. देशाचे भावी आधारस्तंभांना वळण लावणा-या शिक्षकांना जर गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळाले तरच त्यांच्याकडून तयार होणारी नवीन पिढी ही निश्चीतपणे आपल्या देशाला प्रगतीपथावर नेल्याशिवाय राहणार नाही. शिक्षक हा सर्व शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून तो पाठीच्या कण्याप्रमाणे महत्वाचा आहे.

आजच्या युगात कोणत्याही कार्याच्या यशासाठी प्रशासन, व्यवस्थापन आणि संघटन या महत्वाच्या बाबी आहेत. शिक्षणक्षेत्रात काम करीत असताना दैनंदिन जीवनातील विविध घटकांमध्ये समन्वय, सुसूत्रता साधून योग्य प्रशासन असेल तरच कार्यवाही उत्तम प्रकारे होते.

प्रशासनाची संकल्पना केवळ अध्ययन अध्यापनाशीच किंवा कार्यालयीन कामकाजाशीच संबंधित आहे असे नसून प्रत्येक कार्यात प्रशासन ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे वेळ, पैसा व श्रम यांचा योग्य प्रकारे विनियोग करण्यात प्रशासन महत्वाची भूमिक बजावते.

प्रशासनाचा संबंध केवळ कार्यकारी व्यक्ती, अधिकारी, कर्मचारी असा नसून त्यामध्ये मानवी संबंधांची गुंफण साधून कार्य साधावे लागते. केवळ प्रशासक आणि कर्मचारी यांच्याशीच प्रशासन संबंधित आहे असे नसून ते विद्यार्थी, शैक्षणिक वातावरण, शिक्षक - विद्यार्थी संबंध अशा विविध बाजू त्यात येतात. कांही बाबी चांगल्या प्रशासनात मदत करतात तर कांही बाबी अडचणी आणतात.

श्री.ए.डी.ताम्हणकर यांनी "शैक्षणिक प्रशासन व नियोजन" या पुस्तकात शैक्षणिक प्रशासनाची व्याख्या खालील प्रमाणे दिली आहे :-

" प्रशासनाचा शब्दश: अर्थ कारभाराची व्यवस्था पाहणे, व्यवहार चालविणे असा होतो" [१]

" सामाजिक आणि राजकीय गरजा व आकांक्षा यावर आधारित समाज आणि शासन यांनी मान्य केलेले हेतू सुकर रीतीने साध्य करण्याकरीता उपलब्ध योग्य साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल अशा अध्ययन आणि अध्यापन विषयक अनुरूप कार्यक्रमाद्वारा मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे प्रवर्तीत करण्याची प्रक्रिया म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय"

शैक्षणिक प्रशासन ह्या शिक्षणाच्या विकासाचा एक अंगभूत भाग आहे. ती नैसर्गिक प्रक्रिया आहे तसेच तो सामाजिक उपक्रमही आहे.

शैक्षणिक प्रशासनामध्ये नियोजन, प्रशासनाच्या निरनिराळया घटकातील संबंध आणि सहकार, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, वित्त व्यवस्था, प्रशासक, शिक्षक व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण, महत्वाच्या साहित्याची तरतूद, संशोधनास आवश्यक बाबींची तरतूद, परिणामांचे मूल्यमापन, समाज व संस्था यातील

---

१. ए.डी.ताम्हणकर, शैक्षणिक प्रशासन व नियोजन, पुणे, नूतन प्रकाशन, १९७६, पान नं.१

२. तत्रैव, पान नं.२.

संबंध, शैक्षणिक नियोजनाला द्यायची प्रसिद्धी, संस्था आणि समाजातील निरनिराळया घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजित करणे आणि कार्यप्रवृत्त करणे आणि भविष्य काळाच्या स्वरूपाविषयीचा अंदाज बांधून त्यासंबंधी मार्गदर्शन करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शैक्षणिक प्रशासन हे कार्यक्षम व प्रभावी असावे लागते. संशोधक शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये काम करीत असल्याने त्यांचा निरनिराळया परिषदा, मेळावे, चर्चासत्रे यामध्ये अनेक विचारवंतांशी, शिक्षण तज्ञांशी संबंध आला. अनेक विषयांवर चर्चा होत असतानाच अध्यापक विद्यालयाच्या प्रवेशासंबंधी विषय चर्चेस आला. अध्यापक विद्यालयामध्ये डी.एड् पदविकेला प्रवेश घेणाऱ्याला नोकरीची शाश्वती वाटत आहे. म्हणून विद्यार्थीही डी.एड्ला प्रवेश घेवू लागले आहेत. डी.एड्ची प्रवेश व्यवस्था, तेथील अध्यापक प्रशासन कसे चालते, अनुदानित व विनाअनुदानित विद्यालयातील आजची नेमकी स्थिती काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली म्हणून संशोधकाने खालील विषय संशोधनास घेतला.

१.०२ <u>संशोधनाचा विषय :-</u>

" सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास"

संशोधन विषय शीर्षकामध्ये आलेल्या शब्दरचनेचा अर्थ, विषय स्पष्ट होण्यासाठी व विषयाची व्याप्ती समजण्यासाठी खालील प्रमाणे दिलेला आहे.

❖ **सोलापूर जिल्हा :-**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी त्याचे जिल्हा, तालुका व ग्रामस्तर असे गट पाडण्यात आले. महाराष्ट्रातील पस्तीस जिल्ह्यापैकी सोलापूर हा जिल्हा मोठा व महत्वाचा आहे. सोलापूर जिल्ह्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

पूर्वेला : उस्मानाबाद जिल्हा आहे,

पश्चिमेला : पुणे जिल्हा आहे,

दक्षिणेला : कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा आहे,

उत्तरेला : अहमदनगर व उस्मानाबाद जिल्हे आहेत.

या सोलापूर जिल्ह्यामध्ये बार्शी, करमाळा, माढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ, मंगळवेढा, अक्कलकोट, सांगोला, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर असे अकरा तालुक्यांचा समावेश होतो. शिक्षणाच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा महाराष्ट्रात आघाडीवर आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे उपकेंद्र सोलापूर शहरामध्ये आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अनुदानीत ७ व विनाअनुदानीत १० अध्यापक विद्यालये आहेत. एकूण सतरा अध्यापक विद्यालये आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये १४ अध्यापक विद्यालये मराठी माध्यमाची, २ अध्यापक विद्यालये उर्दू माध्यमाची व १ विद्यालय इंग्रजी माध्यमाचे आहे.

**❖ अध्यापक विद्यालय :-**

कला, विज्ञान व वाणिज्य या तीन शाखेसाठी वेगवेगळी प्रवेश क्षमता टक्केवारी शासनाने ठरवून दिली आहे. त्यानुसार तीन शाखेतील बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार डी.एड् पदविका प्रथम व द्वितीय वर्ष इत्यादीचा समावेश होतो. भविष्य काळात नागरिक बनविण्याचे कार्य शिक्षक करीत असतो. तो शिक्षक या अध्यापक विद्यालयामधून घडविला जातो. सामाजिक विकासासाठी शिक्षकाचे कार्य मोलाचे असते. अध्यापक विद्यालय हा शिक्षणाचा महत्वाचा पाया आहे.

**❖ प्रशासन :-**

या संशोधनात प्रशासन हा शब्द शैक्षणिक प्रशासन या अर्थाने वापरला आहे. " शैक्षणिक कृती, योजना, कार्यक्रम व सवलतीच्या बाबतीत मार्गदर्शन करणारी व दीर्घकालीन आणि व्यापक संदर्भात नेतृत्व पुरविणारी सामाजिक निती म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय."

" निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे कार्य चालण्याचे दृष्टीने निरनिराळया नियमाचा आणि अधिकारांचा वापर करून एकूण कामकाजावर नियंत्रण ठेवणे, उपलब्ध साधन सामुग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल अशा अनुरूप कार्यक्रमाद्वारे मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे प्रवर्तीत करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रशासन होय" ३

प्रशासनामध्ये खालील बाबींचा समावेश होतो -

१. शैक्षणिक नियोजन.

---

३. तत्रैव, पान नं.५

२. प्रशासनातील निरनिराळया घटकांतील संबंध आणि सहकार्य.

३. प्रशासनाचे विकेंद्रीकरण.

४. वित्त व्यवस्था.

५. प्रशासक, शिक्षक व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण.

६. महत्वाच्या साहित्याची तरतूद.

७. परिणामांचे मूल्यमापन.

८. समाज व संस्था यातील संबंध.

९. संस्थेतील व समाजातील निरनिराळया घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजित करणे आणि कार्य प्रवण करणे.

१०. शैक्षणिक नियोजनाला द्यावयाची प्रसिद्धी.

११. भविष्य काळाच्या स्वरूपाविषयीचा अंदाज बांधून त्या संबंधी मार्गदर्शन करणे.

❖ **चिकित्सक अभ्यास :-**

सन १९९९-२००० ते २०००-२००१ या शैक्षणिक वर्षातील अध्यापक विद्यालयामधील प्रशासनाच्या समस्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात अपेक्षित आहे.

प्रो. सी. व्ही. गुड यांच्या व्याख्येवरून चिकित्सक अभ्यास म्हणजे " एखाद्या विषयाचा सविस्तर व संपूर्ण अभ्यास, हा अभ्यास कौशल्यपूर्ण व निश्चित स्वरूपाचा असतो. ही अर्थपूर्ण चौकशी असते."[४]

विविध संशोधन साधनांच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण करणे शिवाय अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनात सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक अशा सूचनांचा अविष्कार करणे असा चिकित्सक अभ्यास ह्या शब्दाचा या संशोधनापुरता अर्थ आहे.

**१.०३ <u>संशोधनाची उद्दिष्टे :-</u>**

१. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनामधील शासकीय कार्य, प्रशासकीय भूमिका, सेवा शर्ती व नियंत्रणाचा अभ्यास करणे.

---

४. सी. व्ही. गुड, <u>डिक्शनरी ऑफ एज्युकेशन</u>.

२. अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनातील समस्या शोधणे. त्या समस्यांच्या कारणाचा अभ्यास करणे.

३. अध्यापक विद्यालयातील भौतिक, आर्थिक व शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.

४. अध्यापक विद्यालयातील प्रशासनामध्ये सुधारणा होण्यासाठी उपाय सूचविणे.

## १.0४ संशोधनाची गरज व महत्व :-

### ❖ संशोधनाची गरज :-

व्यावसायिक शिक्षण अधिक जीवनाभिमुख व्यापक बनत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात व्यावसायिक शिक्षणाचा थोडा प्रसार झाला. तसेच वैद्यकीय क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाल्याने मृत्यूदर झपाटयाने घसरला. मात्र जन्मदर जास्त राहिल्याने लोकसंख्येची मोठया प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली. परिणामी प्राथमिक शाळा शासनाला गावोगाव व वाडयावस्तीवर उभ्या कराव्या लागल्या. प्राथमिक शाळेमध्ये शिकवण्यासाठी शिक्षकांची गरज भासू लागली. ती गरज पूर्ण करण्यासाठी शासनाने विविध भागात अध्यापक विद्यालये काढली. अध्यापक विद्यालयाची आज संख्यात्मक वाढ झाली. परंतु गुणात्मक दृष्टया अध्यापक विद्यालये अपूरी ठरत आहेत. संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढीसाठी प्रशासनातील दोष व समस्या याचा अभ्यास करण्याची गरज भासली. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनातील समस्यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला.

### ❖ संशोधनाचे महत्व :-

अध्ययन अध्यापन प्रक्रिया चालू असतानाच त्यावर विविध घटक कार्यरत असतात. त्याचा अनुकूल किंवा प्रतिकूल असा परिणाम होत असतो. म्हणून अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रशासन हा एक महत्वाचा भाग असून शहरी, ग्रामीण, शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील स्थानिक प्रशासनामध्ये फरक असू शकतो. एकाच पद्धतीचे प्रशासन सर्व ठिकाणी योग्य ठरणार नाही. या संशोधनाने अनुदानित व विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामधील प्रशासनाच्या संदर्भात नेमक्या कोणत्या समस्या येतात हे स्पष्ट होईल. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील भौतिक

सुविधा, स्त्री शिक्षणाची व्यवस्था याचा अभ्यास केला जाईल. त्यामुळे प्रशासन प्रभावी व परिणामकारक करता येईल. या संशोधनाचा उपयोग शासनाला, अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांना, अध्यापक विद्यालयाच्या शिक्षकांना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून होईल.

अध्यापक विद्यालयाच्या नेमक्या समस्या लक्षात घेऊन शासकीय पातळीवर जशा सुधारणा करता येतील. तशाच स्थानिक पातळीवर प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांना, शिक्षकांना त्या विद्यालयाच्या संस्था चालकांना ह्या समस्या लक्षात येतील व त्यासाठी उपाय करता येतील.

ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व तंत्रविज्ञान या बरोबरच सुसंस्कार रूजविणे हे शिक्षकाचे महान कार्य, सेवा, सहानुभूती, संस्कार व आदर हे शिक्षकांचे ब्रीद हे सर्व कार्य पार पाडणे ही प्रशासनावर अवलंबून आहे. त्यासाठी प्रशासनातील समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

### १.०५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

१. हे संशोधन सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयापुरतेच मर्यादित आहे.

२. हे संशोधन डी.एड् प्रथमवर्ष व डी.एड् द्वितीय वर्ष या पुरतेच मर्यादित आहे.

३. हे संशोधन शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन या पुरतेच मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधन १९९९-२००० ते २०००-२००१ सालापुरतेच मर्यादित आहे.

५. या संशोधनामध्ये अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनातील महत्वाचे घटक प्राचार्य व संबंधित शासकीय अधिकारी यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

६. या संशोधनामध्ये अनुदानित व विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनाचा अभ्यास केला आहे.

### १.०६ प्रकरणीकरण :-

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणांचे नियोजन खालीलप्रमाणे केले आहे.

➢ प्रकरण पहिले :- प्रास्ताविक.

पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, समस्येची निवड, समस्येचे शब्दांकन, संशोधनाची उद्दिष्टे, समस्येचे महत्व, गरज व्याप्ती व मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

➢ प्रकरण दुसरे :- संबंधित साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास.

दुस-या प्रकरणात संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला. संशोधनावर आधारित इतर संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला. संबंधित संशोधनाचा अभ्यास करण्यात आले. इतर संदर्भ साहित्याचे अध्यापक विद्यालयाचे प्रशासन या संदर्भात अभ्यास करण्यात आले आहे.

➢ प्रकरण तिसरे :- अध्यापक विद्यालयाचे महत्व.

तिस-या प्रकरणात अध्यापक विद्यालयाचे महत्व याचे स्पष्टीकरण करण्यात आले. त्यात सेवापूर्व प्रशिक्षण यामध्ये क्षमता, बांधिलकी, कृतीकार्य इत्यादी तर सेवांतर्गत प्रशिक्षणामध्ये N.P.E. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, N.C.T.E. इत्यादींच्या घटकावर स्पष्टीकरण करण्यात आले.

➢ प्रकरण चौथे :- संशोधनाची पद्धती.

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण संशोधन पद्धतीनुसार तयार केले आहे. सर्वेक्षण संशोधन पद्धतीत सद्यस्थितीची माहिती मिळविणे हा हेतू असतो. संशोधनाची पूर्वतयारी, नमूना निवड, संशोधनाची साधने, प्रश्नावली, मुलाखतीसाठीची प्रश्नसूची, संशोधनाची कार्यपद्धती, भेटी व निरीक्षणे या बाबतचे स्पष्टीकरण करण्यात आले.

➢ प्रकरण पाचवे :- संकलीत माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

या प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती, प्रत्यक्ष भेटी, निरीक्षण व चर्चा याद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि विशदीकरण करण्यात आले आहे.

➢ प्रकरण सहावे :- निष्कर्ष आणि शिफारशी.

सहाव्या प्रकरणात संकलित माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचनाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. सदर निष्कर्ष व शिफारशी सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनातील समस्या याविषयी आहेत. पुढील संशोधनासाठी कांही विषयही सूचविण्यात आले आहेत.